


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक २४, बुधवार ११ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# गुरुवारी नेत्र शिबिर,चष्मा व सायकल वितरण

## ■ मोतीबिंदू शस्त्रक्रियाही होणार ■ शरद पवार यांच्या वाढदिवसाचे निमित्त ■ खा. नीलेश लंके यांचा पुढाकार

**पारनेर : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खा. नीलेश लंके व राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वितरण करण्यात येणार आहे. नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रीया व चष्मा वितरण विविध गावांमध्ये गुरूवार दि. १२ डिसेंबर ते ५ जानेवारी दरम्यान होणार आहे. तर १२ डिसेंबर रोजी पारनेर येथील संपर्क कार्यालयात होतकरू विद्यार्थ्यांना सायकलचे वितरण करण्यात येणार आहे.**

**विविध गावांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिबिरांचा तपशील पुढीलप्रमाणे :**





गुरूवार दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता बाभुळवाडे बाजार तळावर बाभुळवाडे व परीसर, सकाळी १० वाजता वडझिरे बाजारतळ येथे वडझिरे, पाडळीदर्या, जाधवाडी व चिंचोलीसाठी.

शुक्रवार दि. १३ रोजी सकाळी ८ वाजता जवळे येथील विठ्ठल मंदीरात जवळे, गांजीभोयरे, सांगवी सुर्या, गुणोरे व गाडीलगांवसाठी,

शनिवार दि.१४ रोजी सकाळी ९ वाजता लोणीमावळा बाजारतळ येथे लोणीमावळा व पाबळसाठी, दुपारी १ वाजता निंबळक ग्रामपंचायत समोर निंबळक, इसळक, खारे कर्जुने, हिंगणगांव, जखणगांव, हमीदपुरसाठी

रविवार दि.१५ रोजी सकाळी ९ वाजता अळकुटी बाजारतळ येथे अळकुटी, गारखिंडी, कळस, पाडळीआळे, शेरी कासारे, म्हस्केवाडी, रेनवडी, चोंभूत, शिरापूर, दरोडी व रांधेसाठी.

सोमवार दि.१६ रोजी सकाळी ८ वाजता राळेगणथेरपाळ बाजारतळावर राळेगणथेरपाळ, कोहकडी, कुरूंद, म्हसेखुर्दसाठी, सकाळी ११ वाजता वाडेगव्हाण ग्रामपंचायत कार्यालय येथे वाडेगव्हाण, मावळेवाडी, यादववाडी, नारायणगव्हाण, पाडळीरांजणगांव.

मंगळवार दि.१७ रोजी सकाळी ८ वाजता राळेगणसिध्दी ग्रामपंचायत कार्यालय येथे राळेगणसिध्दी, पानोली, वडूले, पिंपळनेर, सिध्देश्ववाडी. सकाळी ११ वाजता निघोज कपिलेश्वर मंगल कार्यालय येथे निघोज, वडनेर बु. पठारवाडी, पिंपरीजलसेन, देवीभोयरे.

बुधवार दि. १८ रोजी सकाळी ९ वाजता कर्जुलेहर्या येथे हरेश्वर देवस्थान येथे कर्जुलेहर्या, वाफारेवाडी व कासारेसाठी, सकाळी ११ वाजता कान्हूरपठार ग्रामपंचायत येथे कान्हूरपठार, किन्ही, बहिरोबावाडी, वेसदरे, वडगांव दर्या, पिंपळगांवतुर्क, विरोली, करंदी, गारगुंडी, पिंपरी पठारसाठी.

गुरूवार दि १९ रोजी सकाळी ९ वाजता रांजणगांव मशिद साई मंदीर येथे रांजणगांवमशिद, पिंपरीगवळी, अस्तगांवसाठी, दुपारी १ वाजता रूईछत्रपती येथे रूईछत्रपती, भोयरे गांगर्डा, बाबुड, वाळवणे, रायतळेसाठी.

शुक्रवार दि. २० रोजी सकाळी ९ वाजता खडकवाडी, दुपारी १ वाजता ढवळपुरी बाजारतळ येथे ढवळपुरी, ढवळपुरी परिसर, धोत्रे बु., धोत्रे खु.

शनिवार दि. २१ रोजी सकाळी सकाळी ८ वाजता नांदुरपठार येथील विठ्ठल रूक्मिणी मंदीर येथे. सकाळी १ वाजता पिंपळगांवरोठा ग्रामपंचायत कार्यालय येथे पिंपळगांवरोठा, अक्कलवाडी, कारेगांव.

रविवार दि. २२ रोजी सकाळी ८ वाजता पुणेवाडी भैरवनाथ मंदीर येथे पुणेवाडी, कुंभारवाडी, सोबलेवाडी, हत्तलखिंडी, सकाळी ११ वाजता पारनेर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे पारनेर, लोणीहवेली, डिकसळ.

सोमवार दि.२३ रोजी सकाळी ८ वाजता मांडवे खुर्द बाजारतळ येथे मांडवेखुर्द व देसवडे. सकाळी १०.३० वाजता गोरेगांव बाजारतळ येथे गोरेगांव व पाडळी कान्हूर.

मंगळवार दि.२४ रोजी सकाळी ९ वाजता दैठणेगुंजाळ ग्रामपंचायत कार्यालय येथे दैठणेगुंजाळ, सारोळा आडवाई, हिवरेबाजार, दुपारी १२ वाजता टाकळी ढोकेश्वर येथे मुख्य प्रवेशदवार येथे टाकळीढोकेश्वर, ढोकी, भोंद्रे, काकणेवाडी, तिळोल, वडगांवसावताळ, गाजदीपुर, वासुंदे.

बुधवार दि.२५ रोजी सकाळी ९ वाजता सुपा येथील मुख्य चौकात सुपा, हंगा, शहांजापुर, मुंगशी, म्हसणे सुलतानपुर, वाघुंडे खु., वाघुंडे बु. आपधुप.

गुरूवार दि.२६ रोजी सकाळी ८ वाजता नेप्ती ग्रामपंचायत कार्यालय.

शुक्रवार दि.२७ रोजी सकाळी ८ वाजता काताळवेढा बाजारतळ येथे काताळवेढा व डोंगरवाडी. सकाळी १० वाजता पळसपुर बाजारतळ येथे पळसपुर व ढगेवाडी.

शनिवार दि. २८ रोजी सकाळी ९ वाजता पळशी येथे पळशी व परिसर, दुपारी ३ वाजता देहरे येथे देहरे, विळद, पिंपरीघुमट.

रविवार दि.२९ रोजी जातेगांव भैरवनाथ मंदीर येथे जातेगांव, वडनेरहवेली, गटेवाडी, घाणेगांव, कडूस, पळवे बु, पळवे खु. दुपारी १२ वाजता चास येथे चास, भोयरे पठार, भोयरे खुर्द, पिंपळगांव वाघा.

सोमवार दि. ३० रोजी सकाळी ८ वाजता सारोळा कासार येथे सारोळा कासार, घोसपुरी, खडकी, सकाळी १० वाजता अरणगांव येथे आरणगांव, खंडाळा, खडकी, बाबुड घुमट.

मंगळवार दि. ३१ रोजी सकाळी ९ वाजता वाकोडी येथे वाकोडी व परिसर. दुपारी ३ वाजता शिंगवे नाईक येथे शिंगवे नाईक, नांदगांव, इस्लामपुर, सुजलापुर, कोळपे आखाडा.

बुधवार दि. १ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ वाजता भाळवणी ग्रामपंचायत कार्यालय येथे भाळवणी, माळकुप, वडगांव आमली, भांडगांव, हिवरे कोरडा, काळकुप, जामगांव.

गुरूवार दि. २ रोजी सकाळी ९ वाजता अकोळनेर येथे अकोळनेर, जाधवाडी, भोरवाडी, सोनेवाडी.

शुक्रवार दि.३ रोजी सकाळी ९ वाजता देऊळगांव सिध्दी देऊळगांव सिध्दी, बाबुर्डी बेंद, हिवरे झरे.

शनिवार दि. ४ रोजी सकाळी ८ वाजता कामरगांव बाजारतळ येथे कामरगांव, पिंपळगांव कौडा, सकाळी १० वाजता खातगांव टाकळी येथे खातगांव टाकळी, टाकळी खातगांव, हिवरे बाजार, जखणगांव, निमगांव वाघा, निमगांव घाणा. दुपारी १ वाजता नवनागापुर येथे सहयाद्री चौक येथे नवनागापुर व वडगांव गुप्ता.

रविवार दि. ५ रोजी सकाळी ८ वाजता पोखरी येथील रंगनाथ स्वामी देवस्थान येथे पोखरी, वारणवाडी, कामटवाडी, म्हसोबा झाप, काळेझाप, कन्हेर. दुपारी १२ वाजता वनकुटे ग्रामपंचायत कार्यालय येथे वनकुटे, तास, पठारवाडी व परिसर.

# खा. लंके यांच्याकडून हिंदूवरील अत्याचाराचा निषेध

## जिल्हाधिकारी सालीमठ यांना निवेदन

**नगर : प्रतिनिधी**



**बांगलादेशमधील हिंदूंवर गेल्या काही दिवसांपासून अत्याचार सुरू असून सनातन धर्माविरूध्दच्या कथित कटाचा भाग म्हणून जाणीवपुर्वक मंदिरे आणि हिंदूंना लक्ष्य केले जात असल्याचे नमुद करून खा. नीलेश लंके यांनी हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराचा निषेध केला आहे. तसे निवेदन खा. लंके यांच्यावतीने जिल्हाधिकारी सिध्दराम सालिमठ यांना देण्यात आले आहे.**

यासंदर्भातील निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, बांगलादेशातील हिदू धर्मीयांवर मोठया प्रमाणात अत्याचार सुरू असून काही दिवसांपासून हिंसाचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. बांगलादेशातील अध्यात्मिक गुरू चिन्मय कृष्णदास यांना नुकतीच अटक करून त्यांना तुरूंगात डांबण्यात आले आहे. बांगलादेशमध्ये मानवतेच्या मर्यादा ओलांडल्या जात आहेत. जगामध्ये कोठेही हिंदू धर्मीय किंवा अल्पसंख्यांक धमयांवर होणारा अत्याचार हा अत्यंत चुकीचा असून मानवता धर्म जोपासण्यासाठी महाराष्ट्र व भारत सरकारने यासाठी तातडीने पावले उचलून बांगलादेशमधील हिंदू धमयांना दिलासा द्यावा अशी मागणी सर्व स्तरांवरून होत असल्याचे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

निवेदनात पुढे नमुद करण्यात आले आहे की, हिंदू धर्माने समस्त जगाला मानवतेचा धर्म शिकविला आहे. अत्यंत सहिष्णू असणाऱ्या हिंदू धर्माबाबत बांगलादेशमध्ये मात्र कटटरतावादी धार्मिक व्देषभावना निर्माण करून तेथील स्थानिक हिंदूंचा छळ करत असून त्याचा आम्ही तीव्र निषेध करीत असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

# कुर्ला बस अपघातात ६ जणांचा मृत्यू

## ४० हून जास्त गंभीर जखमी | चालकाला अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

**मुंबईतल्या कुर्ला पश्चिम भागात ९ डिसेंबरच्या रात्री बेस्ट बसचा मोठा अपघात झाला. या अपघातात सहा जण ठार झाले तर ४० हून जास्त लोक जखमी झाले आहेत. या प्रकरणात चालक संजय मोरेला अटक करण्यात आली. लोकांनी बस चालकाला पकडले आणि मारहाण करायला सुरुवात केली होती. मात्र नंतर पोलिसांनी त्याला लोकांच्या तावडीतून सोडवले आणि त्याला अटक केली.**

**पोलिसांनी अपघाताबाबत काय सांगितलं?**

अपघात घडला तेव्हा अपघातग्रस्त बसमध्ये तब्बल ५० हून अधिक प्रवासी असल्याचे पोलिसांनी सांगितले. बस चालक संजय मोरे या बस चालकाला पोलिसांनी अटक केली. त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संपूर्ण अपघाताचा



सीसीटीव्ही समोर आला आहे. ३३२ नंबरची बस कुर्ल्याहून अंधेरीकडे जात असताना हा अपघात घडलाय. तसेच या अपघातानंतर जमावाने बस चालकाला बेदम मारहाण केल्याचं देखील व्हिडीओद्वारे समोर आले आहे. अपघात घडल्यानंतर बस चालक संजय मोरे याला नागरिकांकडून मारहाण करण्यात आली. यावेळी पोलिसांनी धाडस दाखवत संजय मोरेला बाहेर काढलं आणि पोलीस स्थानकात घेऊन गेले. प्रत्यक्षदर्शींनी


उर्वरीत पान ३ वर









# युवा

## दाढी वाकडी तिकडी, पॅचमध्ये वाढलीये?

**सध्या दाढी ठेवण्याचा ट्रेंड आहे. पूर्वी केवळ मिश्यांना महत्त्व होते किंवा पुरुष क्लीन शेव ठेवणे पसंत करायचे. पण आता मात्र ती स्थिती बदलून दाढी आणि मिश्या वाढवणे हे सुंदर दिसण्याचे लक्षण समजले हाते. हॉलीवूडपासून बॉलीवूडपर्यंत मेल सेलिब्रेटी सुद्धा सतत आपल्या दाढीबाबत नवनवे प्रयोग करत असतात. पण असेही पुरुष दिसतात ज्यांना दाढी येत नाही. ज्यांना येते त्यांना खूप येते आणि ज्यांना येत नाही त्यांना काहीच येत नाही. अशावेळी विविध उपाय करण्यास सुरुवात होते. कधी कधी डॉक्टरांचा सल्ला घेतला जातो. मार्केटमध्ये दाढी वाढवण्याचे अनेक प्रोडक्ट उपलब्ध आहेत. पण प्रत्येकालाच त्याचा इफेक्ट दिसतो असे नाही. दाढी न येण्याची अनेक करणे आहेत. जेनेटिक, अनहेल्दी एनव्हायरमेंट, डाएट ही काही प्रमुख करणे आहेत. पण आज आम्ही तुम्हाला अशा टिप्स देणार आहे ज्यामुळे तुम्हाला मस्त घनदाट दाढी येऊ शकते**

- ब्रश करा : ब्रश करणे हे पॅची बिअर्डला ठीक करण्याचा सोप्पा मार्ग आहे. आपल्या दाढीला नरम ब्रिसल्सच्या खालील बाजूस कंगवा फिरवा. लगेच तुम्हाला हे जमणार नाही पण रोज असा प्रयत्न करा. हा एक सोप्पा आणि मस्त मार्ग आहे जो दाढीच्या केसांना एकाच दिशेत ग्रोथ करण्यास मदत करतो. यामुळे तुमची दाढी एकसारखी दिसू शकते. अनेक जाणकार सुद्धा हाच पहिला मार्ग वापरण्यास सांगतात. हा मार्ग तुमच्या दाढीला एक लुक देतो आणि एका सारखी ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे आवर्जून ब्रश करून आपल्या दाढीची काळजी घ्या.
- बिअर्ड ऑईल वापरा : तुम्ही तुमच्या दाढीला रोज रात्री झोपताना तेलाने कंडीशनिंग केले पाहिजे. दाढी वाढवण्यासाठी आणि ती हेल्दी ठेवण्यासाठी तुम्ही दाढी वाढवण्याचे तेल अर्थात बिअर्ड ऑईल वापरू शकता. या ऑईलमध्ये व्हिटामिन आणि पोषक तत्वे खूप जास्त असतात, जी दाढी वेगाने वाढवण्यास मदत करतात. एवढेच नाही तर त्या खालच्या त्वचेलादेखील पोषण देतात. दाढीचे तेल हे मिश्यांसाठी सुद्धा खूप फायदेशीर ठरू शकते. त्यामुळे चांगल्या प्रतीचे बिअर्ड ऑईल वापरून दाढी वाढवा आणि आपले सौंदर्य द्विगुणीत करा.




- केसांना योग्य व्हिटॅमिन व पोषण द्या : दाढी वाढवण्यासाठी आणि ती हेल्दी राखण्यासाठी केसांना योग्य पोषण देणे महत्त्वाचे आहे. तुम्ही जे काही खाता, जे पदार्थ सेवन करता त्याप्रमाणे तुमच्या दाढीवर चांगला किंवा वाईट परिणाम दिसू शकतो. तुम्ही जाणकारांचा सल्ला घेऊन त्याच पदार्थांचे सेवन करा जे दाढीला पोषण देण्यात हातभार लावतील. शिवाय व्यसनांपासून दूर राहा. धुम्रपान आणि मद्यपान हे केसांच्या वाढीवर परिणाम करू शकते. उत्तम लाइफस्टाइल फॉलो करणे हा हेल्दी दाढीचा मूलमंत्र आहे.
- बिअर्ड डायचा वापर : मोठी आणि घनदाट दाढी दिसायला खूप जास्त सुंदर दिसते. जर तुम्हाला पॅची दाढी नको असेल तर नियमितपणे बिअर्ड डायचा वापर करा. बिअर्ड डाय हे तुमच्या दाढीला घनदाट बनवून दाढीचा रंग अजून गडद करण्यात मदत करतात. दाढी ही अशी गोष्ट आहे ती जेवढी तुम्ही जपाल आणि जेवढी त्याची काळजी घ्याल तेवढी ती नीट राहील. त्यामुळे काही गोष्टी या नियमितपणे करणे महत्त्वाचे आहे आणि यातून तुम्हाला एक चांगली हेल्दी व सुंदर दाढी मिळू शकेल.
- केस वाढवा : एक पॅची दाढी स्वतःहून घनदाट होऊ शकते. पण यासाठी तुम्ही जास्त काळ केस वाढू दिले पाहिजेत. तुमच्या दाढीचा आकार काय असेल हे यावर अवलंबून असते की तुमची दाढी केवढी पॅची आहे आणि केस किती कुरळे आहेत. जर तुम्ही यात एक्स्ट्रा कर्ल आणि वोल्युम जोडला तर पॅच तुमच्या दाढीच्या मागे लपले जातील.
- ट्रिमिंग आणि शेविंग : ट्रिमिंग आणि शेव्हिंग केल्याने दाढी पूर्णपणे घनदाट होण्यास मदत होईल. सर्वात प्रथम दाढीसाठी एक सुंदर आकार निवडा आणि पॅच लपविण्यासाठी काळजीपूर्वक ट्रिम करा.

# तरुण पिढी मंदिरात कोर्टात लग्नाचा पर्याय का निवडतेय?

**भारतीय संस्कृतीत लग्न म्हटलं की अगदी धुमधडाक्यात, उत्साहात साजरं होतं. या दरम्यान ट्रेंड म्हणून प्रीवेडिंग शूट आणि बरंच काही केलं जातं. पण या असा असंख्य ट्रेंड्सने लोकांना जितकं आश्चर्यचकित केलं नाही जितकं कोर्ट किंवा मंदिरात होणाऱ्या लग्नांची संख्या वाढल्याने लोक चकित आहेत.**

सगळ्यांचा कल पूर्वी धुमधडाक्यात लग्न करण्याकडे असायचा आणि तो विचार चुकीचाही नव्हता. कारण लग्न ही आयुष्यातली अतिशय महत्त्वाची आणि एकदाच घडणारी घटना असते. लग्नाचा हा क्षण अविस्मरणीय बनवावा आणि सर्वांच्या कायम लक्षात राहावा ही धुमधडाक्यात लग्न करण्यामागे लोकांची भावना असते. पण जसं युग बदलत चाललं आहे तसा नवीन पिढीचा आणि तरुणाईचा लग्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत चालला आहे. पूर्वीसारखं धुमधडाक्यात लग्न करणे म्हणजे खर्चाचा अपव्यय असे त्यांना वाटू लागले आहे. त्यापेक्षा मंदिरात छोटेखानी लग्न करणे किंवा कोर्ट



मॅरेज करणे व लग्नाचा खर्च हा समाजपयोगी कार्यात वापरणे याकडे त्यांचा वाढता कल दिसून येतो आहे. अर्थात हा विचार आजच्या पुरोगामी समाजाच्या दृष्टीने चांगलाच आहे. यातून तरुण पिढीची सामाजिक समस्यांबाबतीत वाढती संवेदना सुद्धा दिसून येते. पण असे का घडतेय? का लग्नाबाबतचे हे विचार बदलत चालले आहेत? चला जाणून घेऊया...

### वास्तववादी दृष्टीकोन

तरुण पिढी ही वास्तव स्वीकारणारी आणि तसा विचार करणारी आहे. त्यांच्या मते आपण जो काही लग्नात १० ते २० लाख खर्च करतो तो न करता ते पैसे साठवले तर त्याचा फायदा पुढे त्यांना आणि येणाऱ्या पिढीला होईल. हेच मुख्य कारण आहे की अनेक कपल्स हे लग्न कमी खर्चात करून ते पैसे बाजूला काढून त्याची गुंतवणूक करतात किंवा त्यांची काही स्वप्न असतील तर ती पूर्ण करण्यावर तो पैसा खर्च करतात. हा दृष्टीकोन भविष्याविषयी ते किती गंभीर आहेत हेच दाखवून देतो.

### विश्वासाला प्राधान्य

आजच्या तरुण पिढीचे मत असे आहे की लग्न हे दोघांचे असते, त्यांचे नाते अधिकृतपणे स्वीकारले जावे म्हणून ते केले जाते. त्यात प्रश्न हा विश्वासाचा असतो ना की लोकांना दाखवण्याचा, त्यामुळे जगाला दाखवण्यासाठी लग्न करण्याची प्रथा हळूहळू तरुण पिढीत मागे पडत चालली आहे. लग्न हा आपला आणि आपल्या जोडीदाराचा खासगी क्षण असून तो घरच्यांसोबतही साजरा केला जाऊ शकतो, लग्न हे विश्वासावर टिकते, तुम्ही किती मोठेपणाने करता त्यावर नाही. असे मत अनेक तरुण उघडपणे मांडतात.

### आर्थिक दबाव नको

मोठे लग्न कार्याचा किमान लाखोंचा खर्च हा होतोच. अनेक कुटुंब असे असतात ज्यांना एवढा खर्च परवडत नाही. मग कर्ज काढणे, उधारीवर पैसे घेणे अशा गोष्टी आल्या, असे हा आर्थिक भार लग्नानंतर आपल्या आई- वडिलांवर पडू नये म्हणून अनेक कपल्स आपली हौसमौज बाजूला ठेवून सध्या लग्नाला प्राधान्य देतात. अनेक सुशिक्षित मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये हा विचार मोठ्या प्रमाणावर रुजतो आहे. कारण यामुळे आर्थिक ताण आपसूकच नाहीसा होतो आणि कपल सुद्धा खुश असते.

### झटपट लग्न

लग्न म्हटलं की मोठी सुट्टी आलीच. नवरा- नवरी दोघे जेव्हा जॉबवर असतात तेव्हा त्यांना लग्नासाठी महिनाभाराची किमान सुट्टी लागते. एवढी मोठी सुट्टी घेणे कधी कधी शक्य होत नाही. कधी कधी लग्नाच्या काळात एखादा मोठा प्रोजेक्ट येतो जो करिअरसाठी फायद्याचा असतो. असा प्रोजेक्ट टाळणे बऱ्याचदा शक्य नसते. म्हणून झटपट लग्न करण्याचा निर्णय घेतला जातो. सगळी तयारी कमी वेळात करणे शक्य नसल्याने कपल्स साध्या पद्धतीने लग्न करण्याचा पर्याय निवडतात.

### आंतरजातीय विवाह

हे कारण काहीसे वेगळे आणि आपल्या समजाचे वेगळे भीषण वास्तव दाखवणारे आहे. आपल्याकडे आजही जातींवरून भेदभाव केला जातो. जर कोण आंतरजातीय लग्न करत असेल तर त्याच्यावर बहिष्कार टाकणे, दुषणे लावणे, बदनामी करणे हे प्रकार केले जातात. म्हणजे जरी कोणाला मोठे लग्न करायचे असले तरी तिथे कोणी येणार नसते. त्यामुळे आंतरजातीय लग्ने ही सहसा साध्या पद्धतीने आणि बहुतांश कोर्टातच केली जातात.

# हिवाळ्यात ट्रेकवर जाण्यापूर्वी...

**हिवाळ्यात फिरायला जाण्याचे म्हणजेच वेकेशनचे प्लॅन जोरात सुरू होतात. मित्र मंडळी आणि फॅमिली पिकनिकसोबत सोलो ट्रिपही अनेक जण प्लॅन करतात. या काळात ट्रेक अथवा उंच हवेच्या ठिकाणी जाण्याची एक वेगळीच मजा असते. यंदाच्या हिवाळी वेकेशनमध्ये तुम्ही ट्रेकवर जायचा प्लॅन करत असाल तर त्याआधी काही गोष्टींची व्यवस्थित तयारी करा. कारण हिवाळ्यात ट्रेकवर अथवा थंड हवेच्या ठिकाणी गेल्यावर तुम्हाला थंडीपासून बचाव करण्यासाठी काही टिप्स तुमच्या नक्कीच फायद्याच्या ठरतील...**



### अनुभवी ट्रेकर्सचे मार्गदर्शन

**ट्रेकचा खरा आनंद घ्यायचा असेल तर पहिल्यांदा नवीन ठिकाणी जाताना तुम्ही एखाद्या अनुभवी ट्रेकरसोबत अथवा ट्रेकच्या ग्रुपसोबत जायला हवं.**

- जास्तीचे कपडे : ट्रेकसाठी डोंगर माथ्यावर गेल्यावर हिवाळ्यात सर्वात जास्त गारवा असतो. अशा थंडीपासून वाचण्यासाठी तुम्हाला जास्तीचे गरम कपडे नक्कीच लागू शकतात. तेव्हा तुमच्या ट्रेकिंग सॅकमध्ये तुमच्या शरीराचे तापमान नियंत्रित ठेवतील असे कपडे घ्यायला विसरू नका. थर्मल्स, ग्लोव्हज, कानटोपी, जॅकेट, जीन्स असे कपडे सोबत असतील तर तुम्ही ट्रेकचा आनंद मनसोक्त घेऊ शकता.
- ट्रेकिंगची वेळ : ट्रेकिंग करणं हा एक अदभुत अनुभव असतो. ट्रेकिंगचा रस्ता जरी छोटा असला तरी तो थरारक अनुभव आयुष्यात एकदा तरी प्रत्येकाने अनुभवायला हवा. उन्हाळ्यात ट्रेक करणं हिवाळ्याच्या मानाने सोपं असतं. मात्र हिवाळ्यात डोंगरमाथ्यावरील नजारा आणि धुकं आणि ढगांच्या सहवासात शिखर चढण्याची मजाच वेगळी आहे. यासाठी लक्षात ठेवा हिवाळ्यात लवकर दिवस उगवतो आणि रात्रही लवकर होते. त्यामुळे त्यानुसार तुमचा ट्रेक प्लॅन करा.
- सुरक्षेची साधने : हिवाळा असो वा कोणताही ऋतू ट्रेक करताना तुमच्या जवळ सुरक्षेची साधनं असायलाच हवीत. जर तुम्ही बर्फाळ डोंगरावर ट्रेकसाठी जाणार असाल तर तुमच्यासोबत ट्रायल मॅप, पॉकेट नाइफ, हँड वॉर्मिंग पॅकेट, होकायंत्र, प्रथमोपचार किट, स्लीपिंग बॅग, मोबाईल फोन, चार्जर, पॉवर बँक आणि पुरेसे खाण्याचे साहित्य, पाणी असायला हवेच.
- वातावरणाचा अंदाज : थंड हवेच्या ठिकाणी डोंगरमाथ्यावर जाताना तुम्हाला हवामानाचा अंदाज घेता यायला हवा. कारण तुम्ही ट्रेक करणार आहात त्या काळात हवेचा वेग कसा असेल, तुम्ही किती वेळ ट्रेक करणार आणि तिथले वातावरण दिवसा आणि रात्री कसे असेल यावरून तुमचा ट्रेक सुखकारक होऊ शकतो. अंदाज न घेता कधीच कोणत्याही नवीन ठिकाणी ट्रेक करू नका.

# लग्नाच्या काळात नको जीवाची ओढाताण

**सध्या लग्नाचे दिवस सुरू आहेत. पण या काळात लग्न घरातील प्रत्येक माणूस आपल्या आरोग्याची काळजी घेत नाही. यासाठी आम्ही काही खास टिप्स दिल्या आहेत. या टिप्स वापरून या धावपळीच्या दिवसात तुम्ही देखील स्वःताची काळजी घेऊ शकता**

थंडीच्या काळीत लग्नाचा मोसम सुरू झाला आहे आणि आप्तेष्टांबरोबर हे दिवस साजरे करण्यासाठी सर्वजण सज्ज झाले आहेत. मात्र अशा विशेष कार्यक्रमांसाठी तयारी करत असताना स्वतःसाठी वेळ काढणं कठीण होऊन बसतं. सणसमारंभाच्या काळात सर्वांत जास्त परिणाम स्त्रियांवर होतो. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ मिळत नाही. सण समारंभाचे दिवस आनंदाचे असतात आणि त्यामुळे नातेसंबंध आणखी दृढ होतात. मात्र हे सगळं साजरं करत असताना आरोग्य न बिघडण्याची काळजी घेणं आवश्यक आहे. योग्य आहार घेणं, भरपूर पाणी पिणं, नियमित व्यायाम, आणि त्वचेची योग्य काळजी या उपाययजोना करून स्वतःची काळजी घेणं महत्त्वाचं असतं.



### तीन महत्त्वाच्या टीप्स

1 खाण्यापिण्याकडे लक्ष द्या : लग्न आणि इतर सणसमारंभात तेलकट, गोड आणि कॅलरीचं प्रमाण जास्त असलेले पदार्थ मोठ्या प्रमाणात खाल्ले जातात. हे पदार्थ जास्त प्रमाणात खाल्ले तर पोट जड वाटू लागतं. डायबेटिस आणि उच्च रक्तदाब हे आजार असतील तर त्यांचं प्रमाण वाढतं. अशा वेळी क्विनोआ, खजूर, शेंगदाणे आणि बिया यांच्यापासून तयार केलेले गोड पदार्थ आरोग्यदायी पर्याय म्हणून खावेत. तसंच पाणी भरपूर प्यायल्यामुळे त्वचा उजळते, शरीराला ऊर्जा मिळते आणि पचन सुधारते. एक चांगला बदल म्हणून आहारात लिंबू, बेरी, किंवा काकडीचा समावेश करा.

2 थकवा आणि बर्नआऊट घालवण्यासाठी योग्य आहार घ्या : सुप्राडीन सर्वेक्षणानुसार ८१ टक्के जनतेला त्यांची ऊर्जा कमी होत आहे असं वाटत राहतं. अशा सणासमारंभाच्या वेळी ऊर्जा आणखी खर्च होते. तेव्हा ऐन कार्यक्रमाच्या वेळी थकवा येऊ नये यासाठी मल्टिव्हिटामिन सप्लिमेंट्स, विशेषतः व्हिटामिन बी अधिक प्रमाणात घ्यावं. ऊर्जा निर्माण करण्यासाठी या व्हिटामिन भूमिका महत्त्वाची आहे. लोहाचं आहारात महत्त्व आहे कारण त्यामुळे अनेक मिनरल्स शरीराच्या वेगवेगळ्या भागांना मिळतात. त्यामुळे ऊर्जा मिळते आणि स्नायूंचं आरोग्य चांगलं राहतं.

3 त्वचेची योग्य काळजी घ्या : या काळात प्रदूषण आणि थंडी दोन्ही वाढते. त्याचा त्वचेला त्रास होऊ शकतो. सणसमारंभाच्या काळात त्वचा चांगली ठेवण्यासाठी त्वचेची योग्य काळजी घ्या. त्यासाठी एक वेळापत्रक तयार करा. व्हिटामिन ए, सी, आणि इ आणि ओमेगा -३ फॅटी असिड यामुळे त्वचा उजळते आणि त्वचेचा कोरडेपणा कमी होतो. व्हिटामिन ए मुळे त्वचेत सुधारणा होते. व्हिटामिन सी मुळे काळे डाग कमी होतात आणि कोलॅजिन तयार व्हायला मदत होते. व्हिटामिन इ मुळे ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी होतो आणि ओमेगा ३एस मुळे कोरडेपणा आणि खाज कमी होते. लग्नसमारंभ हे आपल्या लोकांबरोबर साजरे केल्यामुळे या आठवणी कोरल्या जातात. त्यामुळे योग्य आहार घेणं, भरपूर पाणी पिणं आणि आपल्या त्वचेची योग्य काळजी घेणं अतिशय महत्त्वाचं आहे.

### इतरांच्या विचारांचा तुमच्यावर प्रभाव पडू देऊ नका

कुटुंब, नातेवाईक किंवा मित्रांनुसार जीवन जगणे थांबवा आणि स्वतःच्या जीवनाची जबाबदारी घ्या. इतर लोकांच्या विचारधारा आणि दृष्टिकोनांचा तुमच्यावर प्रभाव पडू देऊ नका. त्यांच्या आवडी-निवडीकडे दुर्लक्ष करा आणि तुमच्या इच्छेनुसार आयुष्य जगा आणि त्यांच्या म्हणण्यावर आधारित निर्णय घेणे टाळा. इतरांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून आणि पुढे गेल्यास नकारात्मकता टाळता येते.

### नकारात्मक लोकांपासून अंतर ठेवा

तुमची वागणूक योग्य ठेवण्यासाठी, तुम्हाला दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांपासून अंतर ठेवा. यामुळे त्या व्यक्तीची विचारधारा हळूहळू तुमच्यावर वर्चस्व गाजवू लागते आणि वागण्यात बदल होतो. अशा स्थितीत तुमच्या कामात व्यस्त राहा आणि अशा लोकांशी बोलणे आणि तुमचा अभिप्राय देणे टाळा.

# घटस्फोटित व्यक्तीसोबत लग्न करताना काय काळजी घ्यावी..?

**करीना कपूर तिच्या सडेतोड उत्तरांसाठी ओळखली जाते. हीच बेबो एक काळ असता होता जेव्हा विवाहित पुरुषांपासून चार हात लांब राहण्याचा प्रयत्न करायची आणि आज हीच परखड बोलणारी बेबो एका घटस्फोटीत व्यक्तीची पत्नीच नाही तर त्याच्या प्रेमात वेडी आहे. पण तरीही आपल्या आयुष्यात अशी कधी वेळ आली की आपण आपल्यापेक्षा वयाने जास्त असलेल्या मुलांच्या प्रेमात पडलो तर नक्की काय करावं? प्रेम हे कधीही, कुठेही, कोणाशीही होऊ शकतं. त्याला बंधनं अजिबात नाहीत पण आपण अशा नात्यात जाण्याआधी काय काळजी घ्यावी? जाणून घ्या!**

- सिक्रेट रिलेशनशिप : जर एक तरुणी म्हणून तुम्हाला तुमच्यापेक्षा मोठ्या वयाच्या पुरुषाशी प्रेम झालं आणि तो आधीपासून विवाहित व विभक्त झालेला असेल आणि तुम्ही दोघांनी ठरवलं असले की याबद्दल कोणाला काही सांगायचं नाही, वेळ आली की सरळ लग्न करायचं, तर ही गोष्ट कदाचित तुमचं चारित्र्य कलंकित करणारी ठरू शकते. तुम्ही इतका मोठा निर्णय स्वतःने घेतल्याने घरातील लोकही दुखावू शकतात. दुसरी गोष्ट म्हणजे समजा त्या पुरुषाने तुमची साथ सोडली तर तुमचं आयुष्य सुद्धा उद्ध्वस्त होऊ शकतं, म्हणून प्रेम करणे चुकीचं नाही पण चुकीच्या माणसावर प्रेम होऊ नये याची काळजी घ्यावी आणि घरच्यांना विश्वासात घ्यावे.



- वयातले अंतर : प्रेम करताना जरी हा मुद्दा दुय्यम वाटत असला तरी भविष्याच्या दृष्टीने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. अशावेळी त्या व्यक्तीची हेल्थ हिस्ट्री अर्थात त्या व्यक्तीला कोणता आजार आहे किंवा नाही ते जाणून घ्यावे. कारण उद्या अचानक काही झाले व त्याने तुमच्यापासून आजार लपवला तर तुमच्या भविष्यावर परिणाम होऊ शकतो. याशिवाय वयात जास्त अंतर असल्यास म्हातारपणी तो व्यक्ती तुमची कितपत साथ देईल याची शाश्वती देता येत नाही.
- आर्थिक स्थिती : प्रेम कोणावरही करा किंवा कोणासोबतही लग्न करा, पण चांगल्या भविष्यासाठी त्या व्यक्तीची आर्थिक स्थिती उत्तम असणे गरजेचे आहे. म्हणतात न प्रेम नाही तर पैसा पोसतो. त्यामुळे जगण्यासाठी आणि उत्तम जीवनशैलीसाठी त्या व्यक्तीची आर्थिक स्थिती भक्कम असणे आवश्यक आहे आणि तसे नसेल तर तुम्ही स्वतःच्या मनाची तयारी करून जास्त सुखावह नसेल असे जीवन काढण्यास तयार राहायला हवे. पण जर तुम्हाला चांगले भविष्य असले तर तुम्ही नक्कीच या गोष्टीचा गांभीर्याने विचार करायला हवा.
- विश्वासाचे नाते : तुम्ही ज्या व्यक्तीवर प्रेम करत आहात तो व्यक्ती विश्वासू असावा. तो विवाहित असेल तर त्याला खरंच त्याच्या पत्नीपासून विलग व्हायचे आहे का त जाणून घ्यावे. अन्यथा एक संसार उद्ध्वस्त करण्याचे पातक तुमच्या माथी येऊ शकते. तो व्यक्ती खरंच तुमच्याशी लग्न करणार आहे का याबद्दल तुम्हाला स्वतःला खात्री हवी. कारण तो व्यक्ती फक्त शारीरिक सुख म्हणून तुमच्याकडे पाहत असेल तर अशा व्यक्तीची जोडीदार म्हणून निवड केलेली न बरी.

## शॉर्ट न्यूज

### बार असोसिएशन २० डिसेंबरला निवडणूक

■ **नगर :** जिल्हा न्यायालयातील अहमदनगर बार असोसिएशनच्या सन २०२५ वर्षासाठी निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल झाले असून अर्जाची छाननी, माघार आदी प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. निवडणुकीतील सहसचिव, महिला सह सचिव, खजिनदार, महिला व पुरुष कार्यकारिणी सदस्य आदी पदांवर प्रत्येकी एकच अर्ज शिल्लक राहिल्याने या पदांची निवडणूक बिनविरोध झाली. उर्वरित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव या पदांच्या निवडणुकीसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. अरुण भालसिंग यांनी दिली.

### ग्रामपंचायत कामात भ्रष्टाचार केल्याचाआरोप

■ **नेवासा :** सुरेशनगर ग्रामपंचायतने १५ व्या वित्त आयोगातून न झालेले काम केल्याचे दाखवून गैरव्यवहार केल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्यने केला. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. याबाबत मंत्रालयात लेखी तक्रार केली आहे. कामाची मंजुरी १ लाख ३५ हजार ९३५ रुपये असताना सरकारी तिजोरीतून १ लाख ७२ हजार रुपये सुटले आहेत. कामाची चौकशी क्वालिटी कंट्रोल (गुणनियंत्रण) अधिकाऱ्यांमार्फत व्हावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा अमृत उभेदळ आणि ग्रामपंचायत सदस्य विकास उभेदळ यांच्यासह ग्रामस्थांनी केला आहे.

### सेंद्रिय पद्धतीने शेतीला प्राधान्य द्यावे

■ **संगमनेर :** रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत खराब होत असून, त्याचा उत्पादनावरदेखील परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी सेंद्रिय पद्धतीने शेती करण्याला प्राधान्य द्यावे. तसेच जमिनीचा कर्ब वाढविण्यासाठी पिकांची फेरपालट करून कडधान्यांची पिके घ्यावीत, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी रेजा बोडखे यांनी केले. जागतिक मृदा दिनानिमित्त तालुक्यातील चौधरवाडी येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

### शेवगावात ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीम

■ **शेवगाव :** ईव्हीएम हटाव, देश बचाव, या वंचित बहुजन आघाडीच्या स्वाक्षरी अभियानास शेवगाव शहरात उस्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशान्वये महाराष्ट्रातील सर्व मतदार संघात ईव्हीएम विरोधात मतदार स्वाक्षरी मोहीम दि. ३ ते १६ डिसेंबर पर्यंत राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने काल शेवगाव येथे शहर व तालुक्यातील अनेक मतदारांनी ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीमेत सहभाग घेतला.

### महायुती सरकारने कर्जमाफी करावी

■ **श्रीगोंदा :** २०१९ ला जनतेने देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत, असा कौल दिला होता. मात्र, काही कारणाने शक्य झाले नाही. आता जनतेच्या भक्कम पाठिंब्यामुळे त्यांना मुख्यमंत्री पदाची संधी मिळाली. महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, अशी शेतकऱ्यांची व आमदार म्हणून माझी ही अपेक्षा राहणार आहे, असे प्रतिपादन आमदार विक्रम पाचपुते यांनी केले. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर श्रीगोंदा शहरात भाजपच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष केला.

# स्व.बारकूशेठ भाईक : गावचे कारभारी कुटूंबाचे आधारवड



स्वर्गीय बारकूशेठ जनाजी भाईक(मा.सरपंच) यांचे वयाच्या ८१व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.एक सत्शील, चारित्र्यसंपन्न, आधारवड म्हणून काटाळवेढे आणि परिसरात बारकूशेठ या नावाने ते सर्वांना परिचीत होते.गेली ६० वर्षे पारनेर,जुन्नर आणि शिरूर तालुक्यातील विविध भागात नातेवाईक, मित्रपरिवार, समाजकारण, राजकारण, अध्यात्म आदी विविध क्षेत्रात कार्यरत असताना आपली स्वच्छ प्रतिमा आणि माणुसकी जपणारे निष्कलंक व्यक्तीमत्व म्हणून त्यांचा नावलौकिक होता.

सन १९४३ मध्ये काटाळवेढे सारख्या गावात तत्कालीन गाव कारभारी स्व. जनाजी पाटील आणि स्व.माता सईबाई यांच्यापोटी आप्पांचा जन्म झाला. आई वडील, तिघे भाऊ आणि एक बहीण असा आप्पांचा परिवार होता. त्यातले आप्पा सर्वात लहान. तसे पाहता आप्पांचे बालपण खडतरच गेले. आप्पांना शिक्षणाची आवड असल्यामुळे प्राथमिक शिक्षण काटाळवेढे येथे घेऊन पुढील शिक्षणासाठी त्यांना बेल्हे याठिकाणी पाठवले. आप्पांनी नातेवाईकांकडे राहून मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यावेळेस आप्पांना नोकरीच्या विविध संधी असूनही त्यांनी आपल्या कुटुंबाला व गावाला प्राधान्य दिले. शिक्षण पूर्ण करून आप्पांनी कुटुंबात कुटूंबप्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. शेतीला जोड व्यवसाय असावा म्हणून आप्पांनी किराणा दुकान तसेच पुढे पिठाची  गिरणी गावात सुरू केली आणि तेव्हापासूनच आप्पांना सर्वजण बारकूशेठ नावाने संबोधू लागले.व्यवसायाच्या माध्यमातून लोकांची सेवा करत असताना लोकांशी जास्त संपर्क आला .

आप्पांमध्ये असलेला प्रामाणिकपणा, जिद्द, चिकाटी,शिक्षण पाहून लोकांनी त्यांची १९८० ते ८५ दरम्यान  बिनविरोध गावचे सरपंच म्हणून निवड केली.त्या काळात आप्पांनीही प्रामाणिकपणे गावची सेवा करून विविध विकासकामांना चालना दिली.गावच्या संपूर्ण जडणघडणीत आप्पांचा खूप मोठा सिंहाचा वाटा राहिला आहे.राजकारणात आप्पांनी तालुक्याचे माजी आमदार स्व.वसंतराव झावरे पाटलांना खंबीर साथ दिली.तसेच ते शेवटपर्यंत पक्षाशी एकनिष्ठ राहिले.आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना घडविण्यातही आप्पांच्या वाटा मोठा आहे.

पुढे आप्पांचा परिवार वाढत गेला.त्यांचे तसेच आपली बहीण गंगुबाई,भाऊ बबनराव आणि पाटीलबा या सर्वांची लग्न झाली.कुटूंब मोठे झाले.आप्पांनी एकीकडे मुले,मुली,पुतणे, पुतण्या यांच्या शिक्षणावर भर दिला तर दुसरीकडे काळाची पाऊले ओळखून शिरापूर आणि टाकळीहाजी या गावांमध्ये आपल्या भावांच्या साथीने तब्बल २५ एकर बागायत जमीन खरेदी केली.यातून आप्पांची दूरदृष्टी दिसून येते.

आप्पा आज आपल्यात नसले तरी तरी त्यांचे चाहते म्हणून अनेक आठवणी डोळ्यासमोर येतात.आप्पांना प्रचंड माणुसकी.त्यामुळे त्यांच्याकडे गावातील अनेक माणसे , नातेवाईक,मित्रमंडळी गप्पा मारण्यासाठी तसेच सल्ला घेण्यासाठी आणि न्याय निवाडा करण्यासाठी येत जात असायचे.न्याय निवाडा करण्यात तर त्यांचा हातखंडा होता. आप्पांनी कधीही कुणाला नाराज केले नाही किंवा चुकीचा सल्ला दिला नाही.त्यांचा नातेवाईक परिवार तर खूपच मोठा.आप्पांचे नातेवाईक परिवारामध्ये तर प्रचंड आदराचे आणि मानाचे स्थान होते.सगळेच नातेवाईक आप्पांचा सल्ला घेतल्याशिवाय कुठलीच गोष्ट करत नव्हते.

सर्व काही सुरळीतपणे चालू असताना तीन महिन्यांपूर्वी आप्पा आजारी पडले.त्यांच्या मुलांनी त्यांना पुणे येथील प्रतिथयश अशा दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. आप्पांनी त्यांच्या आईवडीलांची खूप सेवा केली होती.त्याचप्रमाणे त्यांच्या मुलामुलींनीही आप्पांची प्रचंड सेवा केली.त्यांना आजारातून बरे करणारच असा त्यांनी निश्चयच केला होता परंतू ईश्वरीसत्तेपुढे आणि काळा पुढे कुणाचे काही चालत नाही.आप्पा सर्वांना सोडून गेले.त्यांच्या जाण्याने कुटूंब, नातेवाईक आणि सर्व गावाला प्रचंड दुःख झाले. आप्पांनी त्यांच्या मुलाबाळांना दिलेली शिकवण, केलेले संस्कार,वसा आणि वारसा  आजही त्यांची मुले,मुली,पुतणे, पुतण्या सांभाळत आहेत आणि यापुढेही आप्पांचा तोच वसा, वारसा पुढे चालवतील यांची आम्हाला १०० टक्के खात्री आहे.

आप्पांचा मोठा मुलगा बाजीराव भाईक गुरूजी हे प्राथमिक शिक्षक असून ते शिक्षक संघटना तसेच गावच्या जडणघडणीत सक्रियपणे काम करत आहेत.दुसरे चिरंजीव संजय भाईक हे भारतीय आयुर्विमा महामंडळात विकास अधिकारी असून त्यांच्या युनियनमध्ये उच्च पदस्थ म्हणून काम करतात.तिसरे चिरंजीव संपतराव भाईक हे प्रगतिशिल शेतकरी आहेत.पुतणे भाऊसाहेब भाईक गुरूजी प्राथमिक शिक्षक असून पत्नी जिजाबाई ,मुली शारदाबाई ,नंदाबाई,पुतणे म्हातारबा, पुतण्या कासुबाई,लिलाबाई,बाळुबाई, कोंडाबाई,अनुसया,भिमाबाई ,
सुना सुमन,सुनंदा ,अर्चना,सारजा,हौसा,हे सर्वजण आपापल्या क्षेत्रात आदर्श काम करून संसार प्रपंच यशस्वीपणे करत आहेत.नातवंडं डॉ. राहूल,डॉ.काजल,किरण हे कवठे येमाई ता..शिरुर जि.पुणे येथे सुमन हॉस्पीटल व मेडिकल चालवत आहेत.तसेच  डॉ.मयुर ,अजित, अमोल,साहिल, सृष्टी, देवयानी हे डॉक्टर, इंजिनिअर इ.क्षेत्रात आहेत. हे सर्व पाहण्यासाठी आप्पांचे असणे आवश्यकच होते .आप्पांची उणीव पदोपदी, क्षणोक्षणी जाणवते आहे.

**■ शब्दांकन**
**श्री.खंडुशेठ भाईक**
**(मा.संचालक,कृ.उ.बा.समिती, पारनेर)**
**युवराज भाईक सर.**

### परिवाराने केली बाजी फाऊंडेशनची स्थापना

**आप्पांच्या स्मरणार्थ परिवाराने एकत्र येत वडीलांच्या बारकू नावातील बा आणि आईच्या जिजाबाई नावातील जी हे अक्षर घेऊन बाजी फाऊंडेशनची स्थापना केली आहे.त्या माध्यमातून समाजातील गोरगरीब, वंचित घटकातील विद्यार्थी तसेच इतर घटक यांना दरवर्षी मदत केली जाणार आहे.**

# थिटे फार्मसी कॉलेज मार्फत एड्स विषयी जनजागृती

### आजाराची लक्षणे व उपचाराविषयी मार्गदर्शन

**शिरूर : प्रतिनिधी**

**श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी (डी फार्म./ बी फार्म.) मार्फत एड्स सप्ताह निमित्त जनजागृती करण्यात आली.**



दि. ६ डिसेंबर रोजी डॉ. महेश खरात, कम्युनिटी कोऑर्डिनेटर, नारी संस्था भोसरी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी एड्स या आजाराविषयी मार्गदर्शन करताना आजार कसा होतो, त्याची लक्षणे, आजार होऊ नये म्हणून काय करावे व आजार झाल्यावर औषधोपचार काय घ्यावे याविषयीचे संपूर्ण मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

दि. ७ डिसेंबर रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी व अपोलो टायर्स फाउंडेशन व क्लासिक इंडस्ट्रीज अँड एक्स्पोर्ट लि. यांच्या वतीने शिरूर शहरामध्ये एड्स या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी रॅली व पथनाट्य यांचे आयोजन करण्यात आले. डी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून एड्स या आजाराविषयी समज, गैरसमज, औषधोपचार, प्रतिबंध याविषयी माहिती दिली.

यावेळी डी. फार्मसी चे प्राचार्य डॉ अमोल शहा सर, बी. फार्मसी चे प्राचार्य डॉ. द्वारकादास बाहेती सर, अपोलो टायर्स फाउंडेशनच्या वतीने सीएसआर मॅनेजर श्री प्रवीण चंदनकार सर, प्रा. विशाल कारखिले, प्रा. मीनाक्षी वाजे, प्रा. निखिल केदारी, प्रा. मानसी गरदरे, प्रा. नयना पवार, डॉ. मनोज तारे, डॉ. सचिन कोठावदे, प्रा. मोनाली परभने, प्रा. विद्या पाचरणे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. एड्स सप्ताह मधील कार्यक्रमांचे आयोजन प्रा. विशाल कारखिले व प्रा. मोनाली परभणी यांनी केले.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एड्स आजाराविषयी केलेल्या जनजागृती अभियानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र थिटे, सचिव श्री धनंजय थिटे संचालक डॉ. हर्षवर्धन थिटे यांनी कौतुक केले.

# नारायणगावला शिवप्रताप दिनानिमित्त रक्तदान शिबिर

### २६३ रक्तदात्यांनी केले उत्स्फूर्त रक्तदान

**नारायणगाव : प्रतिनिधी**

**विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाच्या वतीने कार सेवक कोठारी बंधू यांचे स्मरणार्थ व शिवप्रताप दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**



या रक्तदान शिबिरात नारायणगाव येथे १४१ तर बेल्हे येथे १२२ रक्तदात्यांनी रक्तदानाचे कर्तव्य पार पाडले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी बजरंग दलाच्या सर्व पदाधिकारी व बजरंगीनी अथक परिश्रम घेतले अशी माहिती बजरंग दल जिल्हा विशेष व्यक्ती संपर्कप्रमुख विशाल बाणखेले यांनी दिली.

रक्तदान शिबिरास गावातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणार्या मान्यवरांनी भेटी दिल्या.बजरंग दलाच्या या उपक्रमाची दखल घेत नारायणगावचे प्रथम लोकनियुक्त सरपंच बाबूभाऊ पाटे यांनी संयोजकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. संयोजक नयन खैरे यांनी सर्व रक्तदात्यांचे आभार मानले.

# कराडच्या कृषी प्रदर्शनात सोन्याचा बोलबाला!

### मालकाला वर्षाला देतो ३५ लाखांचे उत्पन्न । खुराकही आहे तगडा

**सातारा : प्रतिनिधी**

**दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीदिनानिमित्त कराड शेती उत्पन्न बाजार समितीनं भरवलेल्या कृषी, औद्योगिक प्रदर्शनात जातीवंत जनावर शेतकऱ्यांचं आकर्षण ठरली. गडहिंग्लजमधील मुऱ्हा जातीचा सव्वा टनाचा रेडा आणि जतच्या खिलार सोन्या बैलानं सर्वांचं लक्ष वेधलं. तसंच जातीवंत जनावरांच्या स्पर्धेतही बाजी मारली.**



गेल्या तीन दिवसांपासून कराडमध्ये यशवंत कृषी, औद्योगिक, पशुपक्षी प्रदर्शन सुरू आहे. या प्रदर्शनात कोल्हापूर जिल्ह्यातील हसुरचंपू (ता. गडहिंग्लज) गावातील स्वप्नील पोवार यांचा सव्वा टनाचा मुऱ्हा जातीचा धिप्पाड रेडा शेतकऱ्यांचं आकर्षण ठरला. ३८ महिने वयाच्या या रेड्याचं नाव युवराज आहे. यापूर्वी सहा प्रदर्शनांमध्ये युवराजनं पहिल्या क्रमाकांच बक्षिस पटकावलेलं आहे. कराडच्या प्रदर्शनातही युवराज पहिल्या क्रमांकाच्या बक्षिसाचा मानकरी ठरला.

स्वप्नील पवार यांनी हरिणायातून म्हैस खरेदी केली होती. म्हैशीबरोबर चार दिवसांच्या रेड्यालाही आणलं होतं. तेव्हापासून त्याला पौष्टीक खुराक देऊन त्याचं संगोपन केलं आहे. त्याचं युवराज, असं नामकरण करण्यात आलं. गोळी, सरकी पेंड, हरभरे, रताळी, गाजरं, असा त्याचा खुराक आहे. युवराजला २५ लाखाला मागणी आली होती. पण, आम्ही त्याला विकलं नाही, असं स्वप्नील पवार यांनी सांगितलं.

जत तालुक्यातील उमराणी गावच्या विद्यानंद चन्नाप्पा आवटे यांच्या खिलार जातीच्या सोन्या बैलानंही शेतकऱ्याचं लक्ष वेधलं. जातीवंत खिलार बैलाच्या स्पर्धेतही त्यानं पहिला क्रमांक पटकावला. साडे सहा फूट उंच आणि साडे नऊ फूट लांबीच्या धिप्पाड सोन्याबरोबर सेल्फी काढण्याचा मोह तरूणांना आवरला नाही. खिलार जातीमधील हा सर्वात उंचीचा बैल आहे. त्याला रोज ३ डझन केळी, दिवसातून पाचवेळा हिरवा चारा, मक्याची ४० कणसं, असा खुराक दिला जातो. त्याच्या रेतनातून वर्षाला ३० ते ३५ लाखांचं उत्पन्न मिळतं. या बैलापासून पैदास झालेल्या वासरांना लाखो रूपयांची मागणी असते, असं विद्यानंद आवटे यांनी सांगितलं.

# जलसंधारण कामांमुळे बहरल्या करंजीतील फळबागा !

### जलसंधारणाच्या ३९ कामांमुळे शाश्वत जलसाठा उपलब्ध

**पाथर्डी : प्रतिनिधी**

**पाथर्डी तालुक्यातील करंजी गावात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत जलसंधारणाची विविध कामे केल्याने शाश्वत जलसाठा उपलब्ध झाला आहे. फळबागांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आहे.**



करंजी हे बाजारपेठेचे गाव म्हणून ओळखले जाते. दिवसभरात दहा ते पंधरा हजार प्रवासी गावात ये-जा करतात. त्यामुळे गावकऱ्यांसोबत या प्रवाशांसाठीदेखील पिण्याचे पाणी आवश्यक असते. गावात फळबागांचे प्रमाणही अधिक अर्थात एकूण पिकांच्या ७५ टक्के आहे. या फळबागांसाठी मुबलक प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते.

पाण्याचे योग्य नियोजन करण्यासोबत पाणीसाठ्यात वाढ करण्याची आवश्यकता लक्षात घेवून गावाने प्रधानमंत्री कृषी सिंचन योनजेंतर्गत जलसंवर्धनाची विविध कामे हाती घेतली. जलस्रोतांमधील गाळ मोठ्या प्रमाणात काढण्यात आला आणि आवश्यक तिथे दुरूस्तीची कामे करण्यात आली. गाळ काढून परिसरातील शेतात टाकण्यात आल्याने शेतीसाठी त्याचा फायदा झाला. गावात पाणलोट विकास समितीमार्फत ४ ठिकाणी सिमेंट नाला बांध दुरुस्ती आणि १९ सामुहिक शेत तलावाची कामे घेण्यात आली. याशिवाय ३ मातीनाला बांध, ८ चेक डॅम, समतल चर, संयुक्त गॅबियन, सलग समतल चर अशी ३९ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या कामांवर १ कोटी ३४ लाख रुपये खर्च करण्यात आले. या सर्व कामांमुळे गावातील पाणीसाठा वाढण्यास मदत झाली.गावाला आता पाणी टंचाईचा सामना करावा लागणार नाही. पिण्यासाठी आणि सिंचनासाठी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाले आहे. जलसंधारणाची आणखी कामे घेण्याचा ग्रामस्थांचा निर्धार आहे.गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत विविध कामे घ्यायची आहेत.

# डॉ.बाबासाहेबांचे विचार लोकशाही बळकटीसाठी अंमलात आणा- प्राचार्य डॉ. हरी मोरे



**सोनई : प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर अर्थतज्ञ, कायदेपंडित, तसेच सर्वांच्या समान हक्कासाठी लढणारे समाजसुधारक होते. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा मोलाचा संदेश त्यांनी वंचित समाजाला दिला. समानतेच्या न्यायासाठी त्यांनी धम्माचा स्वीकार केला. आपल्या वाङ्मयातून त्यांनी देश सुधारण्यासाठीच्या उपाययोजना सांगितल्या. लोकशाही बळकटीकरणासाठी सर्वांनी डॉ. बाबासाहेबांचे विचार अंमलात आणावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. हरी मोरे यांनी केले.**

मुळा एज्युकेशनच्या कृषी महाविद्यालय सोनई, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. हरी मोरे बोलत होते.

व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप तांबे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. संदीप तांबे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. जातीपातीला न मानता, भेदभावाच्या भिंती बाजूला ठेवून विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे आवाहन उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे यांनी केले. यावेळी उदय दारकुंडे, अंकिता देशमुख, ऋषिकेश वाघोले, अनुष्का दहातोंडे, गिरीश गवांदे, हर्ष चिल्लारे उपस्थित होते.

(पान १ वरून)

## कुर्ला बस अपघातात ६ जणांचा मृत्यू

**नेमकं काय सांगितलं?**

बेस्टच्या चालकांची दादागिरी आम्ही नेहमीच पाहतो, खासगी गाड्या असणारे जेव्हा साईड मागतात तेव्हा साईड हे लोक देत नाहीत. ज्या बसचा अपघात झाला त्याचा वेग खूप जास्त होता असं एका प्रत्यक्षदर्शीने सांगितलं. तर गजबजलेल्या रस्त्यावर इतक्या वेगात गाडी कशी काय चालवली या लोकांना कुणी जाब विचारणार की नाही? असे दुसरा प्रत्यक्षदर्शी म्हणाला.

५०० मीटर अंतरावरुन बस वाहनं आणि लोकांना उडवत गेली

आणखी एक प्रत्यक्षदर्शी म्हणाला की मी समोरच उभा होतो. बस आमच्यासमोरून अत्यंत वेगाने गेली. वाहनं उडवली, लोकांना उडवलं, एकच हलकल्लोळ सुरु झाला. या सगळ्यांना उडवून त्या बस चालकाने महिलेलाही उडवले. आम्हाला शक्य होते तेवढी मदत आम्ही लोकांना करत होतो. मात्र पोलीस लवकर आले नाहीत. तरीही लोक एकमेकांना मदत करत होते. साधारण ५०० मीटर पासून बस प्रचंड वेगात आली होती ती वाटेतल्या वाहनांना, लोकांना धडका देत बस आली हे आम्ही पाहिलं असं प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

सर्वात आधी बसने तीन रिक्षांना उडवले आणि चालकाचं संतुलन बिघडलं की काय माहीत नाही पण बसने सुरुवातीला तीन रिक्षांना उडवलं. त्यानंतर ती बस इतर वाहनांना आणि वाटेत येणाऱ्या लोकांना उडवत गेली. आम्ही ते दृश्य पाहून खूप घाबरुन गेलो असेही एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले.

# शिरुरच्या राजकीय विद्यापीठाची फडणवीसांना भुरळ!

## जुन्या आठवणींना उजाळा देत रंगला गप्पांचा फड

**निघोज : प्रतिनिधी**

**शिरुर तालुक्याच्या राजकारणातील विद्यापीठ अशी ओळख असलेले माजी आमदार पोपटराव गावडे तब्बल ६२ वर्षापासून जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय आहेत! यशवंतराव चव्हाण साहेबांपासून विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सर्वांची राजवट गावडे साहेबांनी जवळून अनुभवली ! अनेक राजकीय घडामोडींचे साक्षीदार असलेले पोपटराव गावडे म्हणजे प्रचलित राजकारणातील चालते- बोलते विद्यापीठच होय!**



आता हेच पाहा ना! कोपर्डी येथील दुदैवी निर्भयाच्या बहिणीच्या विवाहानिमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माजी आमदार पोपटराव गावडे यांची जन्मभुमी असलेल्या टाकळी हाजी गावात आले...राज्याच्या समाजजीवनात खळबळ उडवून देणाऱ्या कोपर्डीच्या दुदैवी घटने नंतर संवेदनाशील मनाच्या फडणवीस साहेबांनी पिडीत कुटुंबाशी सातत्याने संवाद ठेवला निर्धारीत वेळेत आरोपी गजाआड करुन कायदेशीर प्रक्रिया सुरु केली...ही घटना घडली त्या काळात राज्याचे नेतृत्व देवेंद्रभाऊ करत होते संपुर्ण राज्यात आंदोलनाचे लोण पोचले होते..समाजमाध्यमा पासून राजकीय स्तरावर ही फडणवीस यांच्या वर विविध प्रकारचे द्वेष आरोपांची राळ उठवली जात होती ... मात्र या सर्व प्रसंगाचा ध्यैर्याने सामना करत फडणवीस यांनी कणखर प्रशासक कसा असावा याचा वस्तूपाठ राज्याला दाखवून दिला ...कोपर्डीच्या दुदैवी निर्भयाच्या कुटुंबातील प्रत्येक घटकाशी मागील तब्बल आठ वर्षापासून सातत्याने संवाद ठेवून संवेदनशीलतेचा प्रत्यय दिला.

विवाह निमित्ताने टाकळी हाजी येथे आलेल्या फडणवीस यांनी माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या बरोबर दिलखुलास गप्पा मारल्या... शिरुर तालुक्या पासून राज्याच्या राजकारणातील बदलत गेलेले संदर्भ जाणून घेत विद्यमान विधान सभेतील नव्याने आकाराला आलेले सामाजिक समिकरणे, त्याचा महायुतीला झालेला फायदा विशेषतः ओबीसी जातसमुहाने फडणवीस यांच्या नेतृत्वावर ठेवलेला विश्वास या सारख्या असंख्य मुद्दा वर दोन्ही नेत्यांमध्ये मनमुराद चर्चा झाली...माजी आमदार पोपटराव गावडे यांची तब्बल ६२ वर्षाची सार्वजनिक जीवनातील वाटचाल , ही अतिशय प्रेरणादायी असल्याचे कौतुक उदगार मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले.

मुख्यमंत्री फडणवीस व पोपटराव गावडे यांनी काही काळ विधानसभेत एकत्र काम केले आहे . त्याही काळातील जुन्या आठवणींना नव्याने उजाळा मिळाला..व्यस्त कार्यक्रमातूनही वेळ काढून मुख्यमंत्री फडणवीस यांनी टाकळी हाजी येथील गावडे हवेली मध्ये चहापान स्विकारुन आजही पोपटराव गावडे यांचे महाराष्ट्र च्या राजकारणातील स्थान आधोरेखित केले हे मात्र नक्की.

# विविध गुणदर्शन स्पर्धेत रांधे शाळेचे यश

## तालुकास्तरीय स्पर्धेत कामगिरी

**रांधे : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषद अहमदनगर व पारनेर पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत रांधे येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन करीत शाळेच्या नावलौकीकात मानाचा तुरा रोवला.**




### यशस्वी विद्यार्थी

**हस्ताक्षर स्पर्धा : किलबिल गट चैतन्य रविंद्र चौधरी प्रथम क्रमांक, बाल गट आरोही गणेश आवारी व्दितीय क्रमांक. वेशभुषा सादरीकरण : बाल गट आराध्या संतोष काटे प्रथम क्रमांक. वैयक्तिक गीत गायन स्पर्धा : किशोर गट साई गणेश आवारी तृतीय क्रमांक. सांस्कृतीक स्पर्धा : रांधे शाळा तृतीय क्रमांक.**

जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल सरपंच संतोष काटे यांनी यशस्वी विद्याथ तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा कात टाकू लागल्या असून विविध क्षेत्रामध्ये या शाळांचे विद्यार्थी आपली चुणूक दाखवित आहेत.

खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव एकीकडे फुटलेले असताना जिल्हा परिषदेच्या शाळांकडे दुर्लक्ष होत होते. मात्र या शाळांमधील शिक्षकांनी आपली गुणवत्ता सिध्द करीत जिल्हा परिषदेच्या शाळांचे वेगळेपण दाखवून दिले आहे. विविध स्पर्धा परीक्षांमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेचे विद्यार्थी चमकताना दिसत आहेत. या शाळांच्या या यशामुळे प्रत्येक वर्गाचा पट वाढत असून जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी ही आनंदाची बाब आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी ग्रामपंचायतच्या वतीने हवे ते सहकार्य देण्याची आपल्यासह उपसरपंच व इतर सदस्यांची तयारी असून शाळेच्या शिक्षकांनी आपल्या शाळेच्या दर्जामध्ये अशीच वाढ करण्याचे आवाहन सरपंच संतोष काटे यांनी केले.

# एडससारख्या आजारावर नियंत्रण आणता येते

## डॉ. विकास वाळुंज यांचे प्रतिपादन



**अळकुटी : प्रतिनिधी**

**एड्स सारख्या महाभयंकर आजारावर उपचाराच्या माध्यमातून नियंत्रण आणता येते असे प्रतिपादन प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. विकास वाळुंज यांनी केले.**

१ डिसेंबर जागतिक एडस दिनानिमित्त अळकुटी महाविद्यालयात जनजागृती अभियानांतर्गत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. वाळुंज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. कुंदा कवडे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

जिल्हा रूग्णालयाच्या जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण विभागाच्या प्रमुख डॉ. कल्पना कुमठेकर म्हणाल्या, सन २०१७ पर्यंत एडसमुळे जगभरात २.९८ कोटी ते ४१.५ कोटी लोकांचा मृत्यू झाला आहे. आज अंदाजे ३.६७ कोटी लोक एचआयव्हीसह जगत आहेत. ज्यामुळे एड्स हा आजार अभिलिखित इतिहासातील सर्वात महत्वाच्या जागतिक सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक आहे. वैज्ञानिकदृष्टया त्यावर नियंत्रण शक्य असल्याचे डॉ. कुमठेकर म्हणाल्या.

यावेळी उपप्राचार्य प्रा. अमोल नालकर, प्राचार्य प्रा. प्रशांत लोखंडे, प्रा. संजय जाधव, प्रा. विशाल रोकडे, प्रा. दत्तात्रेय शेळके, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. शर्मिष्ठा बोरूडे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. मच्छिंद्र बेनोटे, प्रा. सचिन बलसाने, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. ऋषीकेश गिते, प्रा. पुजा वैरागर, प्रा. पांडूरंग उघडे, प्रा. अनुराधा गाढवे, डॉ. शांता थोरात, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संदीप गेटम, प्रा. मोहन माने, गोरख घोलप, सुर्यमाला भोर, सुनिता भालेराव, विकास सोनवणे, छाया म्हस्के, राहुल बोरूडे, सागर शितोळे, मनोहर कनिंग्ध्वज, मच्छिंद्र म्हस्कुले, वैजनाथ आवारी, रविंद्र वाघ, पांडूरंग शितोळे, शिवाजी कळंबे यांच्यासह विद्याथ मोठया संख्येने उपस्थित होते. पोपट सुंबरे यांनी प्रास्ताविक, प्रा. सुषमा करकंडे यानी पाहुण्यांचा परिचय व स्वागत तर प्रा. पुजा वैरागर व प्रा. दशरथ पानमंद यांनी सुत्रसंचलन तसेच प्रा. अर्जुन चाटे यांनी आभार मानले.

# जनतेच्या प्रगतीमध्ये युनियन बँकचे योगदान

## बँकेचे डेप्युटी जनरल मॅनेजर पाल यांचे प्रतिपादन

**निघोज : प्रतिनिधी**

**देशातील जनतेच्या प्रगतीमध्ये युनियन बँक ऑफ इंडियाचे मोठे योगदान असुन सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून त्याची आर्थिक परिस्थिती व जिवन प्रगतीपथावर पोहचण्यासाठी बँक नेहमीच सहकार्य करत आहे असे प्रतिपादन युनियन बँक ऑफ इंडिया चे डेप्युटी जनरल मॅनेजर पाल यांनी व्यक्त केले.**



पारनेर व शिरुर तालुक्यातील अग्रगण्य कृष्णानंद फुड प्राडॉक्ट प्रा लि व उद्योग समूहाला नुकतीच त्यांनी भेट दिली यावेळी ते बोलत होते. शेतकऱ्यांना पिककर्जासोबत जोडधंदे वाढीसाठी कर्जाच्या माध्यमातून मदत करणे हे बँकेचे धोरण असुन याबरोबरच उद्योग व्यवसाय वाढीसाठी कर्जाच्या विविध प्रकारच्या योजना आहे बँक ही सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून काम करत आहे.

हजारो उद्योग व्यवसायला माफक व्याजदरात तात्काळ कर्ज देत आहे त्यामाध्यमातून तरुण उद्योजक घडविण्याचे काम बँक करत असल्याने शेतकरी तरुण छोटे व्यावसायिक व मोठ्या उद्योगांना चालना देऊन देश उभारणीत हातभार लावत आहेत योग्य नियोजन दूरदृष्टी व कष्ट जिद्द चिकाटी असणाऱ्यांना बँक नेहमीच सहकार्य करील अशी भावना श्री पाल यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी मंचर शाखाधिकारी श्री सैनी प्रबंधक श्री मुरकुटे , कृष्णानंद उद्योगाचे मार्गदर्शक माजी उपसभापती श्री खंडूजी भुकन, कृष्णानंद उद्योगाचे चेअरमन दत्ताशेठ भुकन , बालाजी मिल्क इंडस्ट्रीचे अध्यक्ष अरुणशेठ लंके ,साई दुध उद्योग समुहाचे अध्यक्ष मंगेश शेठ लंके ,नाथ कृपा मिल्क चे भाऊसाहेब कोल्हे व मान्यवर उपस्थित होते.


माजी उपसभापती खंडूजी भुकन यावेळी म्हणाले बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला मोठा आधार मिळाल्याने या क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे. सर्वसामान्य दूध उत्पादक शेतकरी ते उद्योग व्यवसाय यांना या बँकेचा मोठ्या प्रमाणात फायदा मिळाला असून ग्रामीण भागातील विकासाभिमुख कायापालट झाला असून या बँकेचे कामकाज सर्वसामान्य जनतेला फायदेशीर असल्याचे प्रतिपादन भुकन यांनी व्यक्त केले आहे.यावेळी या मान्यवरांचा सत्कार माजी उपसभापती खंडूजी भुकन, दत्तात्रय भुकन, मंगेश लंके, अरुणशेठ लंके यांच्या हस्ते करण्यात आला.

# ओम नरसाळेची इस्त्रोसाठी निवड

## डॉ. सी. व्ही. रामन बाल वैज्ञानिक परिक्षेत यश

**गोरेगांव : प्रतिनिधी**

**गोरेगांव येथील ओम नरसाळे याने डॉ. सी.व्ही.रमन बाल वैज्ञानिक परीक्षेत यश मिळविले असून त्याची इस्त्रोसाठी निवड झाली आहे. आ. काशिनाथ दाते यांनी त्याचे अभिनंदन केले.**



डॉ. सी. व्ही. रमन बालवैज्ञानिक परीक्षेअंतर्गत दरवर्षी राज्यातील गुणवत्ताधारक व क्रियाशील विद्यार्थ्यांची परीक्षेच्या माध्यमातून इस्त्रोसाठी निवड केली जाते. नगरच्या रेसिडेन्सियल हायस्कुलचा विद्याथ ओम सुनील नरसाळे याने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. दि. ५ डिसेंबर रोजी श्रीहरीकोटा येथे झालेल्या पी एस एल व्ही ५९ या उपग्रहाचे प्रत्यक्ष प्रक्षेपण पाहण्याची संधी त्यास लाभली. ओम हा गोरेगांव येथील प्राथमिक शिक्षक सुनील नरसाळे व संगीता नरसाळे यांचा मुलगा आहे.

### विविध भेटी

**पी एस लए व्ही ५९ च्या माध्यमातून श्रीहरीकोटा येथे सुर्याच्या बाहय वातावरणाचा अभ्यास केला जाणार असून त्यात सहभागी होण्याची संधी ओम यास मिळाली आहे. त्याने मिळविलेल्या या यशाबद्दल त्याचे मित्र, नातेवाईक, शिक्षक यांनी त्याचे अभिनंदन केले. ४ दिवसांच्या वैज्ञानिक भेटीदरम्यान ओम व त्यासोबतचे विद्याथ श्रीहरीकोटा येथील इस्त्रो संस्थेस भेट, विज्ञान प्रयोग शाळा, तारांगण, प्राणीसंग्रहालय, पक्षी अभयारण्य तसेच क्रोकोडाईल म्युझियम अशा विविध ठिकाणी भेटी देणार आहेत.**

### गुणवंत ओम

**ओम हा इयत्ता पाचवीच्या स्कॉलरशिपचा शिष्यवृत्तीधारक विद्याथ आहे. तो मंथन प्रज्ञाशोध, नॅशनल स्कॉलर सर्च, लक्षवेध प्रज्ञाशोध, डॉ. हेगडेवार प्रज्ञाशोध परीक्षा, सावित्रीबाई फुले प्रज्ञाशोध परीक्षा आदी परीक्षांमध्ये त्याने राज्याच्या गुणवत्ता यादीत यश संपादन केले आहे.**

### ओमचा आदर्श घ्या

**ओमसारख्या आपल्या तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले असून ओमचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी घ्यावा. अगदी परदेशातील परीक्षांसाठीही शासनाच्या अनेक योजना आहेत, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, आपले आई वडील, तालुक्याचे नाव उज्वल करावे.**

**प्रशांत गायकवाड**
संचालक, जिल्हा सहकारी बँक

# नारायणगव्हाण सोसायटीचा उत्तम कारभार

## संचालिका गीतांजली शेळके यांच्याकडून गौरव



**नारायणगव्हाण : प्रतिनिधी**

**नारायणगव्हाण विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची कारभार उत्तम असून या संस्थेचा आदर्श इतर संस्थांनी घेण्याचे आवाहन करीत जिल्हा बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी सोसायटीच्या कारभाराचे कौतुक केले.**

गीतांजली शेळके यांनी नारायणगव्हाण सोसायटीच्या कार्यालयास भेट देत कारभाराची माहीती घेतली. त्यावेळी त्यांनी संस्थेच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले. संस्थेचे संचालक सुरेश बोऱ्हुडे यांनी संस्थेची माहीती शेळके यांना दिली. संस्था जास्तीत जास्त कशी नफयात येईल यासाठी संस्थेचे पदाधिकारी व सर्व संचालक प्रयत्नशील असून संस्थेला लवकरच लेखापरीक्षणाचा अ वर्ग मिळेल असा विश्वास बोऱ्हुडे यांनी यावेळी व्यक्त केला.

संचालिका गीतांजली शेळके यांनी शेतकरी व संचालकांना यावेळी मार्गदर्शन केले. संस्थेच्या सभासदांचे जीवनमान उंचाविण्यासाठी राज्य शासनासह जिल्हा बँकेच्याही अनेक योजना आहेत. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या पदाधिकारी तसेच संचालकांनी या योजना आपल्या स्तरावर राबवून त्याचा लाभ सभासदर शेतकऱ्यांना देण्याचे आवाहन त्यांनी केले. विविध योजना राबविण्यासाठी जिल्हा बँकेचे हवे ते सहकार्य करण्याची आपली तयारी असल्याची ग्वाही शेळके यांनी दिली. विविध योजना राबविल्यानंतर सभासद शेतकऱ्यांसह संस्थेचाही फायदा होईल ही बाबही शेळके यांनी यावेळी निदर्शनास आणून दिली.

यावेळी सेवा संस्थेच्या वतीने संचालिका शेळके यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन सुरेश बोऱ्हुडे, सेवा संस्थेचे चेअरमन काशिनाथ नवले, बाळासाहेब चव्हाण, शंकरराव कांडेकर, माणिकराव शेळके, गणेश शेळके, तालुका विकास अधिकारी प्रभाकर लाळगे, बंडोपंत नाईक, मधुकर पठारे, राजू शेळके आदी यावेळी उपस्थित होते.

# तालुकास्तरीय स्पर्धेत कोहकडी शाळेचे यश

## १२ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड




**सुपा : प्रतिनिधी**

**नगर जिल्हा परिषद व पारनेर तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन स्पर्धेत कोहकडी शाळेने घवघवीत यश संपादन केले. शाळेच्या १२ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड झाली.**

तालुका स्तरावरील स्पर्धा देवीभोयरे व पारनेर येथे पार पडल्या. पारनेर तालुका व नगर जिल्हयात उपक्रमशील शाळा म्हणून लौकिक असलेल्या कोहकडी येथील जिल्हा परिषद प्रथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारात सादर केलेल्या गुणदर्शनामध्ये शाळेच्या लौकीकास कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. कोहकडी शाळेने विविध स्पर्धांतील आपली यशाची परंपरा कायम राखत जिल्हा स्तरावर सहभाग निश्चित केला.

शाळेच्या यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका मंडूबाई दिवटे, शिक्षक राजेंद्र वाबळे, संतोष गाजरे, गोकुळ कळमकर, कमलेश थोरात, शिक्षिका संगिता देशमुख, आशा आननकर, उज्वला काळे, वैशाली औटी यांचे मार्गदर्शन लाभले. कोहकडी शाळेच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

### विविध स्पर्धेतील यश

**समुहगीत गायन : उंच उंच गगनात तिरंगा लहान गट प्रथम क्रमांक, सांस्कृतीक कार्यक्रम : शेतकरी गीत लहान गट व्दितीय क्रमांक, वैयक्तिक गीत गायन कुमार गट सुरज खंडेकर प्रथम, बालगट धनश्री श्रीरसागर प्रथम, वेषभुषा सादरीकरण : किशोर गट कल्पना कोळेकर प्रथम, कुमार गट साक्षी गव्हाणे व्दितीय, बाल गट आराध्या झरेकर व्दितीय, वकृत्व स्पर्धा : कुमार गट अनुष्का गवळी व्दितीय, कथा कथन स्पर्धा : किशोर गट पुष्कर गायकवाड तृतीय. तसेच समुहगीत गायन, वैयक्तिक गीत गायन, वेशभुषा सादरीकरण या स्पर्धेतील विद्यार्थ्यांची जिल्हा स्तरावर निवड झाली.**

# जवळ्यात जगनाडे महाराज जयंती साजरी

## विविध मान्यवरांकडून प्रतिमा पूजन

**जवळा : प्रतिनिधी**

**जवळे येथे श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे शिष्य व १४ टाळकऱ्यांपैकी म्हणून ओळख असणारे श्री संत संताजी महाराज जगनाडे यांची ४०० वी जयंती साजरी करण्यात आली.जवळे ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत सदस्य सोनाली संदीप सालके पाटील , पोलीस पाटील बबनराव सालके यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले**



ग्रामपंचायत सदस्य सोनाली सालके म्हटल्या की संत हे सर्व समाजाचे असतात तसेच संताजी जगनाडे महाराज यांनी त्यांच्या जीवनात केलेल्या कार्यकाळ हा पुढील येणाऱ्या पिढीला ही दिशादर्शक ठरणार असल्याने शालेय अभ्यासक्रमातही त्यांचे विषयी माहिती असणे ही काळाची गरज आहे.

पारनेर तालुका तिळवण तेली समाज तालुका उपाध्यक्ष शिरीष शेलार बोलताना म्हटले की संताजी महाराज जगनाडे हे तुकाराम महाराजांचे शिष्य म्हणून ओळखले जातात ज्या ज्या ठिकाणी तुकाराम महाराजांचे कीर्तन आता तेथे आवर्जून श्री संताजी महाराज जगनाडे हे टाळकरी म्हणून उपस्थित होते त्या प्रत्येक अभंगाचे त्यांनी लिखाण केलेले होते संताजी महाराजांना संसारापेक्षाही धार्मिक याची जास्त आवड निर्माण झाली होती असेही ते म्हणाले.

या कार्यक्रम प्रसंगी जवळे ग्रामपंचायत सदस्य सोनाली संदीप सालके पोलीस पाटील बबनराव सालके रामदास इंगळे समाजबांधव भाऊसाहेब शेलार मदन शेठ रत्नपारखी अशोक शेलार सुभाष शेलार दीपक शेलार , पत्रकार शिरीष शेलार , महेश शेलार, राजेंद्र शेलार, राजेंद्र रत्नपारखी, जयश्री शेलार, लक्ष्मीबाई शेलार आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com